# बृहन्मुंबई महानगरपालिका

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रुस्तम नरसी कूपर रुग्णालय,जुहू

क्र.एचओ/ 15498 / कूपर दि.23.01.2026

## <u>जाहिरात</u>

मा .महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र.एमजीसी/एफ/7925 दि.01.10.2025 नुसार, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रुस्तम नरसी कूपर रुग्णालयाकरिता खालील नमूद करण्यात आलेली विविध पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्वावर दि.31/03/2027 पर्यंत भरावयाची आहेत. सदर पदाकरिता जाहिरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रुस्तम नरसी कूपर रुग्णालयाच्या स्थानिक सुचना फलकावर प्रसिध्द/प्रसारीत करण्यात येत आहे. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता /पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत .

**डॉ.रूस्तम नरसी कूपर रुग्णालय**, **पहिला मजला**, **डी विंग**, **रोखपाल विभाग** (**रुम.नं.** 65) येथे रुपये 790/- **+ 18% जी.एस.टी**. **रु.** 144/- = **एकूण रु**. 934 /- **इतके अर्जाचे शुल्क** 27.01.2026 **ते** 04.02.2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून **सकाळी** 11:00 **ते दुपारी** 03.00 वाजेपर्यंत भरण्यात येईल व त्या पावतीची छायांकित प्रत अर्जासोबत जोडून, पूर्ण भरलेला अर्ज सोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून **हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रूस्तम नरसी कूपर रुग्णायात पहिला मजला**, **डी विंग (आस्थापना विभाग) येथे दि**.27.01.2026 **ते** 04.02.2026 **रोजी संध्याकाळी** 04:00 **पर्यंत प्रत्यक्ष सादर करावा .**

विविध पदांसाठी अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहीत अर्हता / अटींची पुर्तता करीत असून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वारील नियुक्ती करीता ते पात्र आहेत. तसेच अर्जदाराने जाहीरातीत नमूद अर्हतेबाबतची छायांकित प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अवैध ठरविण्यात येईल .

**उमेदवाराच्या अर्जात नित्य वापरात असलेला वैध (valid) ई-मेल आयडी व मोबाईल क्र. असणे आवश्यक आहे.**

- निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या विविध पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.
- तसेच खालील अनुक्रमांक 1 ते 13 मधील उमेदवारांना ★ व ★★ येथे नमुद केलेल्या अर्हता असणे गरजेचे आहे.

★ सबंधीत संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे .

★★ उमेदवार' डीओईएसीसी 'सोसायटीचे' सीसीसी किंवा' ओ 'स्तर किंवा' ए 'स्तर किंवा' बी ' स्तर 'किंवा ' सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे ' एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जीईसीटीचे 'प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा .

| अनु . क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता | मुलाखतीची वेळ व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **वैद्यकीय अधिकारी** (**महिला**-2) | 02 | **एम.बी.बी.एस. रु .90,000/-**<br><br>**एमडी रु 100000/-** | • उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेला असावा.<br>• उमेदवार हा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ( Maharashtra Medical council) यांचेकडे नोंदणीकृत असावा.<br>• उमेदवाराने मान्यताप्राप्त रुग्णालयातून सहा महिन्यांचे दोन सत्र आवासी अधिका-याचे पद (House Post) किंवा एक वर्षाचे सलग निवासी वैद्यकीय अधिका-याचे पद (One year Residency Post) इतका अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे. | दि.09.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 2 | **सहाय्यक वैद्यकीय अधिकारी** | 02 | | | |
| 3 | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ** | 02 | **रु.20,000/-** | • उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (MSBT) ची/ डी.एम.एल.टी. (D.M.L.T.) पदविका उत्तीर्ण असावा. (B.Sc. + D.M.L.T.) | दि.09.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| **4** | **प्रयोगशाळा सहाय्यक** | 04 | **रु.16,000/-** | • उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा रसायनशास्त्र (Chemistry)/सुक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) /जीवरसायनशास्त्र (Biochemistry)/ जैविकतंत्रज्ञान | दि.09.02.2026 सकाळी 11:00 वा. |

| अनु . क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता | मुलाखतीची वेळ व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | (Biotechnology) या मुख्य विषयासह विज्ञान शाखेतील पदवी (Degree in B.Sc.) उत्तीर्ण असावा.<br>• उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यावसाय चाचणी उतीर्ण होणे आवश्यक आहे. | |
| 5 | **ई.सी.जी .तंत्रज्ञ** | 01 | **रु.18,000/-** | ❖ उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा कार्डिओ-टेक्नोलॉजी (Cardio-Technology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in paramedical technology in Cardio Technology) 3 वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा.<br>**किंवा**<br>❖ उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.SC. Physics) पदवी परीक्षा उत्तीण असावा व त्यास ई.सी.जी. मधील कामाचा 6 महिन्यांचा अनुभव असावा.<br>❖ उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. | दि 09.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 6 | क्ष किरण **सहाय्यक** | 04 | **रु.16,000/-** | ❖ उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणरा क्षकिरण विषयातील **बी.पी.एम.टी**. (Bachelor in Paramedical Technology in Radiography) 3 वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने सहा महिन्यांची इंटर्नशीप पूर्ण केलेली असावी.<br>❖ उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. | दि 10.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 7 | **नोंदणी सहाय्यक** | 01 | **रु.14,000/-** | • उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची उच्च माध्यमिक (HSC) शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>किंवा<br>• उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य, विज्ञान, कला, विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधरी असावा.<br>• उमेदवाराला संगणकातील ऑपरेंटींग सिस्टम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेनटेशन, डेटाबेस सॉफ्टेवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्तम ज्ञान असावे. | दि 10.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 8 | **अर्धवेळ नोंदणी सहाय्यक** | 03 | **रु . 6,500/-** | | |

| अनु . क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता | मुलाखतीची वेळ व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 9 | Part time Refractionist | 01 | रु. 13,000/- | • उमेदवार हा शालांत परीक्षेसह (एस एस सी) ऑप्टोमेट्रीमधील 3 वर्षाचा पदविधारक असावा<br>किंवा<br>• उच्च माध्यमिक शालांत (एच एस सी ) परीक्षेसह बी.एस्सी ऑप्टोमेट्रीमधील पदवीधारक असावा पदवीधारक उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल. | दि 10.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 10 | **व्यवसायोपचार तज्ञ (अंशकालिक)** | 02 | रु. 20 ,000/- | • उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा B.Sc (OT) (बी.एस.सी (व्यवसायोपचार)/ B.O.Th. (बॅचलर ऑफ ऑक्युपेशनल थेरपी) पदवीधारक असावा.<br>• उमेदवार महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई येथे नोंदणीकृत असावा. | दि 10.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 11 | **दूरध्वनी चालक 'अ' वेतनश्रेणी** | 01 | रु.14,000/- | • उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>आणि<br>• शासन मान्यता प्राप्त संस्थे मार्फत किमान 6 महिने इतका दूरध्वनीचालक म्हणून अभ्यासक्रम केलेला असावा.<br>• उमेदवाराला मराठी, हिन्दीं, इंग्रजी भाषा किमान लिहिता वाचता व बोलता येणे आवश्यक असावे. | दि 11.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 12 | **प्रयोगशाळा परिचर** | 01 | रू.15000/- | • उमेदवार दहावी/एस.एस.सी उर्त्तीण असावा.<br>• उमेदवार मराठी लिहिता वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. | दि 11.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 13 | **प्रयोगशाळा सेवक** | 07 | रू.15000/- | | |
| 14 | **वीजतंत्री III** | 01 | रू.18000/ | • उमेदवार दहावी/एस.एस.सी उर्त्तीण असावा.<br>• अनु.क्र. 14 ते 20 पदांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा तारतंत्री परवानाधारक उमेदवार किंवा विजतंत्री /तारतंत्री या व्यवसायाचे आयटीआय किंवा एनसीटीव्हीटी परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्रधारक.<br>• उमेदवार १०० गुणांची प्रश्न पत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा | दि 11.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 15 | **तारतंत्री** | 02 | रू.18000/ | | |
| 16 | **तारतंत्री II** | 01 | रू.18000/ | | |
| 17 | **उदवाहनचालक** | 03 | रू.18000/ | | |

| अनु . क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता | मुलाखतीची वेळ व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 18 | उदवाहनचालक नि तारतंत्री-III नि उदंचनचालक | 01 | रू.18000/ | (इयत्त दहावी ) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परिक्षा (उच्च / निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>• उमेदवार मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.<br>उमेदवारांने खात्यामार्फत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीत उर्त्तीण होणे आवश्यक आहे. | दि 11.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 19 | तारतंत्रि - III नि उदवाहनचालक नि उदंचनचालक | 01 | रू.18000/ | | |
| 20 | प्रशितन मदतनीस | 04 | रू.18000/ | | |
| 21 | गवंडी II | 01 | रू.18000/ | • उमेदवार दहावी/एस.एस.सी उर्त्तीण असावा.<br>• उमेदवार १०० गुणांची प्रश्न पत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्त दहावी ) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परिक्षा (उच्च / निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>• उमेदवार मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.<br>• उमेदवारांने खात्यामार्फत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीत उर्त्तीण होणे आवश्यक आहे. | दि 11.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 22 | सुतार | 01 | रू.18000/- | | |
| 23 | कक्षपरिचर | 13 | रू.18000/- | • उमेदवार दहावी/एस.एस.सी उर्त्तीण असावा.<br>• उमेदवार १०० गुणांची प्रश्न पत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्त दहावी ) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परिक्षा (उच्च / निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>• उमेदवार मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.<br>• उमेदवारांने खात्यामार्फत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीत उर्त्तीण होणे आवश्यक आहे. | दि 12.02.2026 सकाळी 11:00 वा. |
| 24 | कक्ष नोकर | 02 | रू.18000/- | | |
| 25 | आया | 25 | रू.18000/- | | |
| 26 | सफाईगार | 33 | रू.18000/- | | |
| 27 | माळी नि सफाईगार | 03 | रू.18000/- | | |
| 28 | माळी | 03 | रू.18000/- | | |
| 29 | सफाईगार नि हलालखोर | 01 | रू.18000/- | | |
| 30 | हमाल | 03 | रू.18000/- | | |

| अनु . क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता | मुलाखतीची वेळ व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 31 | हमाल नि कामगार | 01 | रू.18000/- | | |
| 32 | कामगार | 02 | रू.18000/- | | |
| 33 | ग्रंथालय परिचर | 02 | रू.17000/- | | |
| 34 | रूग्णवाहिनी परिचर | 05 | रू.15000/ | | |
| 35 | शववाहीनी परिचर नि हलालखोर नि रूग्णवाहीका परिचर | 01 | रू.15000/ | | |
| 36 | व्रणोपचारक | 02 | रू.17000/- | | |
| 37 | नाभिक | 01 | रू.15000/- | | |
| 38 | मदतनीस | 01 | रू.18000/- | | |
| 39 | शिंपी | 01 | रू.17000/- | • उमेदवार दहावी/एस.एस.सी उत्तीण असावा.<br>• मान्यताप्राप्त शासकीय संस्थेचे शिवणकला व कातरकामाचा १ वर्षाचा प्रशिक्षणाचा काळ समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र किंवा श्रमिक विद्यापीठाचा किमान २० आठवडयाचा एडव्हान्स टेलरिंग कोर्स समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असावा.<br>• उमेदवार १०० गुणांची प्रश्न पत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्त दहावी ) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परिक्षा (उच्च / निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. उमेदवार मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.<br>उमेदवारांने खात्यामार्फत घेण्यात येणावसाय या व्य- चाचणीतउर्त्तीण होणे आवश्यक आहे. | दि 12.02.2026 सकाळी 11:00 |

❖ **उमेदवारांनी मुलाखत सुरु होण्यापूर्वी 01 तास आधी मुलाखतीच्या ठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

**वयोमर्यादा : दिनांक 01.01.2026 रोजी उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.**

**निवडीचे निकष व कार्यपध्दती :**

- सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल .गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.
- अर्जाचे शुल्क भरण्याचा कालावधी : दि.27.01.2026 ते 04.02.2026 पर्यंत वेळ- सकाळी 11.00 ते 03.00
- अर्ज करण्याचा कालावधी: दि.27.01.2026 ते 04.02.2026 पर्यंत वेळ- सकाळी 11.00 ते 04.00 (सार्वजनिक सुट्टी शनिवार व रविवार सोडून )
- अर्जाचे शुल्क : रुपये 790/- + 18% जीएसटी रु.144/- = एकूण रु. 934/- सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

- **सर्वसाधारण अटी:**
  - उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी अणि पत्रव्यव्हाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पुर्ण असावा.
  - पात्र उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल .
  - कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
  - महिला उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
  - उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
  - त्यांच्या तात्पुरत्या स्वरूपातील सेवेच्या कालावधी एका वेळेस निव्वळ 89 दिवसांपेक्षा जास्त नसेल.
  - तात्पुरत्या स्वरूपातील कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रुस्तम नरसी कूपर रुग्णालय यांच्याकडे राहील.
  - त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
  - नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु. 500 /-स्टॅप पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
  - ते दररोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमॅट्रिक करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल .त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.
  - सदर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ रदद करण्यांत येईल.
  - कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 01 महिना अगोदर पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
  - **नियुक्त झालेल्या उमेदवारास मनपामध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.**
  - हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रुस्तम नरसी कूपर रुग्णालया येथे नियुक्त केलेल्या व विभागप्रमुखांनी नेमणूक केलेल्या कोणत्याही विभागात तीन पाळीत काम करावे लागेल.
  - उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
  - निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती /प्रमाणपत्रे /कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रददबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.

❖ प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रुस्तम नरसी कूपर रुग्णालया यांना आहेत.

**वैद्यकीय, निम वैद्यकीय व प्रशासकीय संवर्गासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी:**

1. उमेदवाराचा पूर्ण भरलेला अर्ज (Application Form)
2. शैक्षणिक प्रमाणपत्रे (Educational Certificates)
   10वी व 12वी चे गुणपत्रक व प्रमाणपत्र, संबंधित पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक कागदपत्रे पदवी/पदविका/पदव्युत्तर/फेलोशिप/MSCIT/टंकलेखन प्रमाणपत्र इ.
3. नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate)
   संबंधित परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र उदा.महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल /फार्मसी कौन्सिल (संबधीत पदाच्या अर्हतेतील आवश्यकतेनूसार)
4. अनुभव प्रमाणपत्रे (Experience Certificates)
5. आधार कार्ड
6. पॅन कार्ड
7. पत्त्याचा पुरावा (Address Proof) – Driving License, Electricity Bill, Voting Id, Ration Card.
8. सर्व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती स्वंयसांक्षाकीत करुन जोडण्यात यावे.

९. महिला उमेदवार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

**मुलाखतीचे ठिकाण : हि.बा.ठा. वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रु.न.कूपर रुग्णालय, जुहू**

**टीप: मुलाखतीसाठी उपस्थित राहताना सर्व कागदपत्रांच्या पडताळणीकरीता मुळ कागदपत्रे बरोबर घेऊन येणे अनिवार्य आहे.**

**विशेष सुचना :**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.
2. अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
3. टपालाने अथवा ऑनलाईन पदधतीने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**सही/-**
**दि.२३.०१.२०२६**
**अधिष्ठाता**
**हिं. बा. ठा. वैद्यकीय महाविद्यालय व**
**डॉ.रुस्तम नरसी कूपर रुग्णालय, जुहू**